संकटे आपल्याला अधिक सक्षम बनवतात

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | गुरवार ५ जून २०२५ | अंक १७२ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु






# बंगळुरुमधील दुर्घटना अत्यंत दु:खद आहे

## ज्यांनी आपल्या प्रियजनांना गमावलं आहे त्यांच्यासोबत माझ्या संवेदना आहेत

बंगळुरूमधील चिन्नास्वामी स्टेडियमबाहेर आरसीबीच्या विजय परेड दरम्यान झालेल्या चेंगराचेंगरीत अनेकांचा मृत्यू झाला. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुने आयपीएल ट्रॉफी जिंकल्यानंतर घरच्या स्टेडियममध्ये खेळाडूंचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी आरसीबीच्या चाहत्यांनी स्टेडियमबाहेर एकच गर्दी केली होती. मोठ्या प्रमाणात गर्दी वाढली. चाहत्यांनी स्टेडियममध्ये जाण्यासाठी गेटवर गर्दी केली होती. चाहत्यांना विनंती करुनही ते ऐकत नव्हते. त्यामुळे नाईलाजाने पोलिसांना सौम्य लाठीचार्ज करावा लागला. त्यामुळे झालेल्या चेंगराचेंगरीत 10 जणांचा मृत्यू झाला. तर अनेक जण जखमी झाले आहेत. बंगळुरुतील या दुर्घटनेनंतर सोशल मीडियावरुन हळहळ व्यक्त केली जात आहे. या दुर्घटनेनंतर देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही शोक व्यक्त केला आहे. पंतप्रधानांनी त्यांच्या एक्स पोस्टमध्ये काय म्हटलंय? "बंगळुरुमधील दुर्घटना अत्यंत दु:खद आहे. ज्यांनी आपल्या प्रियजनांना गमावलं आहे त्यांच्यासोबत माझ्या संवेदना आहेत. जखमींनी लवकर बरं व्हावं अशी मी प्रार्थना करतो", असं पीएमओ एक्स अकाउंटवरुन करण्यात आलेल्या पोस्टमध्ये म्हटलं. दुर्घटनेमुळे अनेक प्रश्नचिन्हे एम चिन्नास्वामी स्टेडियमबाहेर झालेल्या या दुर्घटनेनंतर आता अनेक प्रश्नचिन्हे उपस्थित केले जात आहेत.

### दुर्घटनेनंतर जोरदार राजकारण, राजीनाम्याची मागणी

दरम्यान बंगळुरुतील या दुर्घटनेनंतर आता राजकारण रंगलं आहे. सत्ताधारी-विरोधक यांच्यात खडाजंगी पाहायला मिळत आहे. कर्नाटकाचे उपमुख्यमंत्री डी के शिवकुमार यांनी या सर्व घटनेबाबत जाहीरपणे माफी मागितली. "चाहत्यांची मोठ्या प्रमाणात गर्दी झाली. ही गर्दी नियंत्रणाबाहेर गेली. त्यामुळे मी पोलिसांना दोष देणार नाही. यात पोलिसांचा दोष नाही. या सर्व दुर्घटनेबद्दल मी माफी मागतो", असं डी के शिवकुमार म्हणाले. तर सरकारच्या हलगर्जीपणामुळे ही दुर्घटना घडल्याचा आरोप भाजपकडून करण्यात आला.

# ईश्वर खामकर यांना सकाळचा लोकाभिमुख पत्रकार पुरस्कार प्राप्त

किल्ले धारूर सचिन थोरात धारूर तालुक्यात पत्रकारितेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना न्याय देणे प्रशासनातील चुकीच्या गोष्टीवर अंकुश ठेवणे तसेच राजकीय सामाजिक क्षेत्रातील अचूक वृत्तांकन यामध्ये ईश्वर खामकर यांनी विशेष प्राविण्य मिळवले आहे. याच सर्व गोष्टींची दखल घेऊन दैनिक सकाळ वृत्तपत्र ने छत्रपती संभाजीनगर येथे सकाळचा वर्धापन दिन साजरा करत असताना एक जून रोजी विभागीय लोकाभिमुख पत्रकार पुरस्कार देऊन ईश्वर खामकर यांचा गौरव केला आहे.

धारूर तालुक्यात ग्रामीण भागात ग्रामपंचायत स्तरावर उद्भवणाऱ्या सम स्या शेतकऱ्यांच्या विविध समस्या सोडवण्यासाठी आपल्या लेखणीच्या म ाध्यमातून ईश्वर खामकर हे सातत्यपूर्ण वृत्तांकन करत असतात.तसेच राजकीय परिस्थितीचे अचूक अंदाज सामाजिक क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या सामाजिक संघटना सेवाभावी संस्था यांच्या सामाजिक कार्याला विशेष प्रसिद्धी देऊन त्यांचाही कार्यास बळ देण्याचे



काम ईश्वर खामकर हे दैनिक सकाळच्या माध्यमातून सातत्याने करत असतात.या वृत्तांकनाच्या सर्वच स्तराची दखल घेऊन दैनिक सकाळ वृत्तपत्राकडून छत्रपती संभाजीनगर येथे एक जून रोजी संपन्न झालेल्या वर्धापन दिनानिमित्त ईश्वर खामकर यांना लोकाभिमुख पत्रकार हा पुरस्कार देऊन सन्मानित केले.ईश्वर खामकर यांना हा पुरस्कार प्राप्त झाल्या मुळे विविध सामाजिक संघटना राजकीय नेते तसेच प्रशासकीय अधिकाऱ्यांनी तर व्हाईस ऑफ मीडिया पत्रकार संघटनेच्या वतीने ही ईश्वर खामकर यांना शुभेच्छा



बीड: बीड पंचायत समितीचे माजी सभापती बळीराम गवते यांनी राष्ट्रवादीचे युवा नेते पार्थ दादा पवार यांची पुणे येथे भेट घेतली. यावेळी बीड जिल्ह्यात पक्षसंघटन वाढविण्याच्या दृष्टीने आणि इतर विविध विषयांवर चर्चा केली. यावेळी सोबत फैयाज पठाण, नंदू खोटे

# महावितरण ऑफिस मध्ये अधिकारीच झाले दलाल

बीड प्रतिनिधी:-विभागीय कार्यालय बीड येथील सहायक लेखापाल यांच्या मनमानी कारभार महावितरण मधील विभागीय कार्यालयातील सहाय्यक लेखापाल कंत्राटदारा ना अडवून तुम्ही राजपूत साहेबाना 35% 35%टक्के बजेट वाटपा साठी देता मग आम्हाला 15% टक्के द्या म्हणून अडवणूक करून मानसिक व आर्थिक कोंडी करत आहेत. महावितरण मधील विभागीय कार्यालयातील सहायक लेखापाल यांची दलाली बंद नाही झाली तर सामाजिक कार्यकर्ते राहुल हावळे यांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे.

# नागेश तात्या कर्डिले यांच्या वाढदिवसानिमित्त वैकुंठ रथाचे लोकार्पण




कडा (प्रतिनिधी) आष्टी तालुक्यातील कडा येथील शिवनेरी पतसंस्थेचे चेअरमन तथा कडा किराणा व्यापारी संघटनेचे अध्यक्ष मा.नागेश तात्या कर्डिले यांच्या वाढदिवसानिमित्त लोकनेते आमदार सुरेश अण्णा धस यांच्या मार्गदर्शनाखाली शिवनेरी पतसंस्थेच्या वतीने कडा शहरासाठी अत्यंत आवश्यक असलेला वैकुंठ रथाचे युवा नेते तथा जामगाव चे सरपंच मा.शाम भैय्या धस व ह.भ.प. बबन महाराज बहिरवाल यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले.कडा शहरील एक अत्यंत जिव्हाळ्याचा प्रश्न म्हणजे जर एखाद्या व्यक्तीचा मृत्यू झाला आणि त्या मृत व्यक्तीच्या घरापासून स्मशानभूमीपर्यत जाण्याचा मार्ग लांब असला तर अंत्ययात्रा स्मशानभूमीपर्यत पहोचण्यात अनेक अडचणी येत होत्या. जसे की अंतर जास्त असणे,पाऊस चालू असणे या अडचणी कडा येथील शिवनेरी पतसंस्थेचे चेअरमन नागेश तात्या कर्डिले यांच्या लक्षात आल्या. या अडचणी दुर करण्यासाठी त्यांनी शिवनेरी पतसंस्थेच्या माध्यमातून वैकुंठ रथ बनवला व वाढदिवसानिमित्त त्या वैकुंठ रथाचे लोकार्पण केले. या कार्याचे उपस्थित मान्यवरांनी कौतुक करत नागेश तात्या कर्डिले यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या यावेळी ह.भ.प.बबन महाराज बहिरवाल,शाम भैय्या धस, संदिप खाकाळ,सुनिल सुर्यवंशी,रमजान तांबोळी, राजाबापु कर्डिले,संजय ढोबळे,गोरख कर्डिले,संपत सांगळे, उपसरपंच दिपक कर्डिले,सुरेश राठोड, नितीन शिंगवी, योगेश भंडारी, संजय मेहेर, सुनिल गाडे,राजू शिंदे,गणेश कटारिया,राम ससाणे,सुनिल देशमुख, डॉ.नितीन गोरे,केशव चव्हाण, अशोक कर्डिले,युवराज चव्हाण, विठ्ठल मिसाळ,बाळासाहेब पवळ,रहेमान सय्यद,एसबीआय कडा व्यवस्थापक नवनाथ शेळके,वैद्यनाथ बैकेचे सतिष नगरकर पतसंस्थेचे संचालक आप्पासाहेब सांगळे, संदिप कर्डिले, कुंडलिक कर्डिले,संजय कर्डिले,प्रा.कैलास वायभासे, गोकुळ कर्डिले,आयुब मोमीन,श्रीकृष्ण पाटील, महादेव कोकरे,दत्तात्रय सोनवणे सह कडा शहरातील सर्व किराणा व्यापारी, शिवनेरी पतसंस्थेचे मुख्य व्यवस्थापक प्रशांत गिलचे, अमोल कर्डिले कर्मचारी, ग्रामस्थ उपस्थित होते.


# कोळवाडी जवळ कंटेनर व मोटर-सायकलचा भीषण अपघात; एक ठार

बीड कोळवाडी जवळ कंटेनर व मोटरसायकल यांच्यात भीषण अपघात होऊन एका व्यक्तीचा जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. ही दुर्घटना मंगळवारी संध्याकाळी सुमारे सहा वाजण्याच्या सुमारास घडली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शेख अथर शेख दाऊद (वय ४७, रा. मोहम्मदिया कॉलनी, बीड) हे मांजरसुंबा कडून बीडकडे मोटरसायकलने (क्रमांक चक२३ अक ९९८६) येत असताना, कोळवाडी गावाजवळ मागून भरधाव वेगाने येणाऱ्या कंटेनरने त्यांच्या मोटरसायकलला जोरदार धडक दिली. या अपघातात शेख अथर यांचा जागीच मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे.अपघातानंतर घटनास्थळी ग्रामीण पोलीस दाखल झाले असून, मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी जिल्हा रुग्णालयात पाठवण्यात आला आहे. दरम्यान, अपघात घडवून आणलेल्या कंटेनरला पोलिसांनी ताब्यात घेतले असून, पुढील तपास ग्रामीण पोलीस ठाणे करत आहेत अशी माहिती प्राथमिक स्वरूपाची मिळाली आहे .या अपघातामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून जिल्हा रुग्णालयात नागरिकांची म ोठ्या प्रमाणावर गर्दी झाली आहे.

# बीड बायपास वर फोर व्हीलर व दुचाकीचा भीषण अपघात;नवरा-बायको जागीच ठार

बीड प्रतिनिधी बीड बायपास रोडवर आज (बुधवार) सायंकाळी सुमारे पाच वाजण्याच्या सुमारास एक भीषण अपघात झाला. भरधाव वेगात असलेल्या फोर व्हीलर कारने दुचाकीला पाठीमागून जोरदार धडक दिल्याने मोटारसायकलवरील नवरा-बायको जागीच ठार झाल्याची



घटना बीड बायपासवर घडली असून या अपघातात मृत्यू झालेल्यांची नावे बळीराम पांडू राठोड (वय ४०) व सुमनबाई बळीराम राठोड (वय ३८) अशी आहेत. दोघेही राजपिंपरी (ता. गेवराई, जि. बीड) येथील रहिवासी होते. मिळालेल्या माहितीनुसार, बळीराम राठोड आणि त्यांची पत्नी सुमनबाई हे अंतर्वन पिंपरी तांडा येथे एका लग्नासाठी गेले होते. लग्नाची समारंभ आटोपून ते मोटारसायकलवरून परत येत असताना बीड बायपास रोडवर भरधाव वेगात असलेल्या एका फोर व्हीलर कारने त्यांना पाठीमागून धडक दिली. धडक इतकी जोरदार होती की, दोघांचा घटनास्थळीच मृत्यू झाला.

# मराठा समाजाने तयार केली विवाह आचार संहिता, हुंडा घेणाऱ्यांशी आता कोणतेही रोटी बेटी व्यवहार करणार नाही

पुणे येथील मुळशी येथे वैष्णवी हगवणे हीने हुंड्यापायी जीवन संपवल्याची घटना घडल्यानंतर आता मराठा समाजाने विवाह आचारसंहिता तयार केली आहे. यापुढे मराठा समाजात हुंडा घेणाऱ्या कुटुंबाशी कोणतेही रोटी बेटी व्यवहार करणार नसल्याचे म्हटले आहे. 'मराठा समाज जागा हो, मुलीच्या रक्षणाचा धागा हो, आपली लेक आपली लढाई' अशी भूमिका मांडली. या पत्रकार परिषदेत श्रीकांत शिरोळे, भानुप्रताप बर्गे, श्रीमंत कोकाटे यांनी भूमिका मांडली. पुण्यात मराठा समाजाची नुकतीच बैठक झाली. पुण्यातील वैष्णवी हगवणे यांच्या मृत्यू प्रकरणानंतर मराठा समाज बैठक पुण्यातील सेंट्रल पार्क हॉटेल येथे या संदर्भात बैठक झाली. मराठा समाजाने विवाह सोहळ्या संदर्भातील काही प्रमुख आचारसंहिता यावेळी जाहीर केली. मराठा समजातील धुरिणांनी यावेळी हुंडा देणार नाही आणि हुंडा घेणार नाही असा दंडक घालून दिला आहे. ज्या कुटुंबामध्ये महिलांचा छळ होतो हुंडा घेतला जातो, त्या कुटुंबाशी समाज रोटी – बेटी व्यवहार करणार नाही तसेच ते कुटुंब मराठा समाजातून बहिष्कृत केले जाईल असाही निर्णय यावेळी घेण्यात आला. सामूहिक विवाह सोहळ्यांना प्राधान्य ज्या महिलेचा सासरच्यांकडून छळ होत असेल, त्यावेळी तिचे माहेरचे लोक ठामपणे तिच्यापाठीशी उभे राहतील. कोणत्याही प्रकारचे ओंगळवाणे प्रदर्शन न मांडता विवाह सोहळे साधेपणाने आणि वेळेवर केली जातील. तसेच मानपानाचे सामाजिक प्रदर्शन केले जाणार नाही, जावई मान आदी सर्व मान कौटुंबिक स्वरूपात केले जातील. यापुढे मराठा समाज



सामूहिक विवाह सोहळ्यांना प्राधान्य देईल असेही यावेळी ठरविण्यात आले. विवाह सोहळ्यात एकच व्यक्ती आशीर्वादाच्या स्वरूपातील भाषण देईल. विवाह सोहळा कमीत कमी पाहुण्यांमध्ये पार पडेल. विवाह सोहळ्यातील अनावश्यक खर्च टाळून मुलगी आणि मुलाच्या नावे एफडी केली जाईल, तसेच काही रक्कम गरजवंतांना मदत स्वरूपात दिली जाईल असेही यावेळी ठरवले गेले. विवाह सोहळ्याचा खर्च ५०-५०, प्री-वेडिंग शूट टाळणार वरातीमधील कर्ण कर्कश्य डीजेचा आवाज आणि त्यावरील विभत्स नृत्यं बंद केली जातील, तसेच प्रदूषणयुक्त फटाके वाजवले जाणार नाहीत. यापुढे आता कोणत्याही विवाहाचे प्री-वेडिंग शूट टाळले जाईल. विवाह सोहळ्याचा खर्च वर आणि वधू पक्षाने अर्धा – अर्धा करावा असे ठरविण्यात आले आहे. काही महत्त्वाच्या सूचना आणि नियमावली १ – विवाह ठरविताना दोन्ही कुटुंबीयांच्या पार्श्वभूमी बाबत सखोल माहिती घ्यावी २ – तरुण-तरुणी यांची बैठक घेऊन चर्चेद्वारे त्यांच्याकरिता एक आचारसंहिता ठरवली जाईल ३ – महिलांकरिता एक बैठक घेऊन चर्चेद्वारे एक आचारसंहिता ठरवली जाईल ४ – प्रतिष्ठेच्या संकल्पना बदलाव्या लागतील त्यासाठी मराठा समाज प्रयत्न करेल ५ – पिढ्यानपिढ्यांची मानसिकता बदलण्यास काही कालावधी जाईल याकरिता आवश्यक जन जागृती सातत्याने मराठा समाज प्रयत्न करेल ६ – आदर्श विवाह घडवून

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
गुरवार ५ जून २०२५
https://lokaarambh.com



# संपादकीय

## खरिपातील मूग, उडीद लागवडीचे तंत्र

खरीप हंगामामध्ये मूग आणि उडीद ही महत्त्वाची कडधान्य पिके आहेत. त्यांची मुख्य किंवा आंतरपीक म्हणूनही लागवड करण्यात येते. ही दोन्ही पिके कमी कालावधीची (दोन ते अडीच महिने) आहेत. बाजारातील मागणी व दरही चांगला असल्याने कमी काळात बऱ्यापैकी आर्थिक फायदा देणारी पिके म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. जमिनीची निवड, पूर्वमशागत :या दोन्ही पिकांना मध्यम ते भारी, पाण्याचा उत्तम निचरा होणारी जमीन निवडावी. क्षारयुक्त, पाणथळ तसेच उतारावरील हलक्या जमिनीवर या पिकांची लागवड करू नये. या पिकांना जास्त मशागतीची आवश्यकता लागत नाही. पूर्वीच्या पिकाची काढणी झाल्यानंतर खोल नांगरट करावी. त्यानंतर मृगाचा पहिला मोठा पाऊस पडून गेल्यावर वखरपाळी देऊन, धसकटे, काडीकचरा वेचून घ्यावा. कुळवाच्या एक दोन पाळ्या देऊन जमीन भुसभुशीत करून घ्यावी. शेवटच्या पाळी अगोदर हेक्टरी १५ ते २० गाड्या शेणखत जमिनीत मिसळावे. पेरणीची वेळ :वेळेवर पेरणीस अतिशय महत्त्व आहे. मान्सूनचा पहिला पेरणीयोग्य पाऊस पडल्यावर व जमीन वाफसा आल्याबरोबर लवकरात लवकर मूग, उडिदाची पेरणी करावी. शक्यतो जूनच्या दुसऱ्या पंधरवड्यात पेरणी पूर्ण करावी. पेरणीस उशीर झाल्यास पिकास त्याच्या कायिक वाढीस पुरेसा अवधी मिळत नाही. परिणामी, पिकाची वाढ कमी होऊन फुले, शेंगा कमी लागतात. उत्पादनामध्ये मोठी घट येते. पेरणीस जसा उशीर होईल त्याप्रमाणात उत्पादनातही घट होत जाते. ७ जुलैनंतर या पिकांची पेरणी टाळावी. बियाणे प्रमाण, पेरणीचे अंतर :अपेक्षित उत्पादन मिळण्याच्यादृष्टीने हेक्टरी रोपांची संख्या योग्य प्रमाणात असणे आवश्यक असते. प्रति हेक्टरी रोपांची संख्या राखण्याकरिता १२ ते १५ किलो बियाणे वापरावे. दोन ओळींतील ३० सेंमी. आणि दोन रोपांमध्ये १० सेंमी अंतर ठेवून पेरणी करावी. बीजप्रक्रिया :बियाण्याची उगवण चांगली होण्यासाठी आणि रोपाच्या अवस्थेत बुरशीजन्य रोगांपासून संरक्षण करण्यासाठी पेरणीपूर्वी प्रति किलो बियाण्यास ट्रायकोडर्मा ५ ग्र ॅम किंवा कार्बेन्डाझिम २ ग्रॅम अधिक थायरम २ ग्रॅम एकत्र करून प्रक्रिया करावी. यानंतर रायझोबिअम व स्फुरद विरघळवणारे जिवाणू संवर्धक २५० ग्रॅम किंवा एकत्रित द्रवरूप जिवाणू संवर्धक १०० मि.लि. प्रति १० किलो बियाणे या प्रमाणे प्रक्रिया करावी. बियाणे सावलीत सुकवून लगेच पेरणी करावी. यामुळे मुळांवरील गाठीचे प्रमाण वाढते. पिकास हवेतील नत्र उपलब्ध होतो. खत व्यवस्थापन : या पिकांच्या मुळाद्वारे नत्र स्थिरीकरण चांगले व्हावे आणि मुळाची वाढ योग्य होण्याकरिता सेंद्रिय खतांचा वापर करावा. जमिनीची मशागतीवेळी शेवटच्या वखरणीआधी चांगले कुजलेले शेणखत किंवा कंपोस्ट खत ५ टन प्रती हेक्टरी द्यावे. पेरणीच्या वेळी २५ किलो नत्र आणि ५० किलो स्फुरद हेक्टरी मात्रा द्यावी. यासाठी एकरी २५ किलो युरिया आणि १२५ किलो सिंगल सुपर फॉस्फेट वापरावे किंवा डायअमोनिअम फॉस्फेट (डीएपी) ५० किलो प्रती एकरी द्यावे. आंतरमशागत : उभ्या पिकामध्ये वेळीच आंतरमशागत करणे गरजेचे आहे. पीक पेरणीपासून पहिले ३० ते ४५ दिवस तणविरहित ठेवावे. त्यासाठी पेरणीनंतर २० ते २५ दिवसांनी एक आणि ३० ते ३५ दिवसांनी दुसरी कोळपणी करावी. कोळपणी केल्याने जमीन भुसभुशीत होऊन हवा खेळती राहते. ओलावा टिकण्यास मदत होते. गरजेनुसार एक किंवा दोन खुरपण्या कराव्यात. पाणी व्यवस्थापन :ही पिके प्रामुख्याने पावसाच्या पाण्यावर येणारी आहेत. मात्र फुले येताना आणि शेंगा भरताना ओलाव्याची कमतरता भासू लागते. या स्थितीमध्ये जमिनीत ओलावा कमी झाल्यास हलके पाणी द्यावे. अगदीच पाण्याची कमतरता असले तरी २ टक्के युरियाची (२० ग्रॅम प्रति लिटर पाणी) फवारणी करावी. उत्पादकता कमी असल्याची कारणे :खरीप हंगामात अनियमित पडणारा पाऊस. अयोग्य जमिनीची निवड. जैविक बीजप्रक्रियेचा अवलंब न करणे. सुधारित बियाण्यांचा अभाव. खतमात्रा अपुऱ्या देणे किंवा टाळणे. हेक्टरी झाडांची योग्य संख्या न राखणे.

# जागतिक पर्यावरण दिन : जीवनाचा श्वास वाचवण्याची गरज - तहसीलदार शेळके

बीड प्रत्येक वर्षी ५ जून हा दिवस ‘ जागतिक पर्यावरण दिन ’ म्हणून साजरा केला जातो . १९७२ मध्ये स्टॉकहोम येथे भरलेल्या संयुक्त राष्ट्रांच्या पर्यावरण परिषदेमध्ये या दिवसाची सुरुवात झाली आणि तेव्हापासून संपूर्ण जगभर पर्यावरण रक्षणाबाबत जनजागृती करण्याचा हेतू घेऊन हा दिवस साजरा केला जातो . यावर्षीही या दिवसाचे महत्त्व अधिकच वाढले आहे , कारण आपल्या भोवतालचे पर्यावरण दिवसेंदिवस धोक्यात येत चालले आहे . निसर्गाच्या विविध रूपांना जपणे ही केवळ सामाजिक जबाबदारी नसून ती आपली वैयक्तिक जबाबदारी आहे, हे आता सर्वांनी ओळखले पाहिजे .

पर्यावरण म्हणजे काय :- याचा अर्थ केवळ झाडेझुडपे किंवा प्राणी-पक्षी एवढाच मर्यादित नाही . पर्यावरण म्हणजे आपल्या सभोवतालचा सजीव आणि निर्जीव सृष्टीचा समन्वय — यात जमिन , पाणी , हवा , तापमान , जंगल , सागरे , प्राणी , मानव आणि त्यांची परस्परसंबंधित जीवनशैली येते . या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणून पृथ्वीवरील जीवन शक्य झाले आहे . आपले शरीर , श्वास , अन्न , पाणी , सर्व काही या पर्यावरणावर अवलंबून आहे . त्यामुळे पर्यावरणाचे संरक्षण करणे म्हणजे आपल्या अस्तित्वाचे रक्षण करणे होय .

मात्र मागील काही दशकांत औद्योगिक क्रांती , लोकसंख्या वाढ , आणि अनियंत्रित शहरीकरणामुळे पर्यावरणाचा ऱ्हास वेगाने होत आहे . हवामान बदल , वाढते प्रदूषण , वनोत्पादन , जलस्रोतांचे आटणे , जैवविविधतेचा नाश , मृदा खालावणे , आणि प्रदूषित अन्न व पाण्यामुळे वाढणारे आरोग्यविषयक प्रश्न यामुळे मानवाची जीवनशैलीच संकटात आली आहे . हवामान बदलामुळे आज अनियमित पावसाचे प्रमाण वाढले आहे , काही ठिकाणी अतिवृष्टी तर काही ठिकाणी दुष्काळ यामुळे शेतीवर मोठा परिणाम होतो आहे . परिणामी , अन्नधान्याचे उत्पादन घटले आहे आणि शेतकऱ्यांचे जीवन अधिक अडचणीत गेले आहे . तसेच , हवेत वाढणारे कार्बन डायऑक्साइड आणि इतर हरितगृह वायूंमुळे पृथ्वीचे तापमान वाढत आहे . यामुळे हिमनग वितळत असून समुद्रसपाटी वाढते आहे , ज्यामुळे किनारी भागांमध्ये पूर आणि जमीन गिळंकृत होण्याचे प्रमाणही वाढले आहे .

आपण दैनंदिन जीवनात अनेक अशा सवयी जोपासतो ज्या पर्यावरणासाठी घातक ठरतात . उदाहरणार्थ , प्लास्टिकचा अतिरेक , विजेचा आणि पाण्याचा अपव्यय , खाजगी वाहतुकीचा अत्याधिक वापर , कचऱ्याची अनियंत्रित विल्हेवाट , आणि जंगल भागांत बिनदिक्कत हस्तक्षेप . ही सगळी उदाहरणे दाखवून देतात की आपण आपल्याच हाताने आपल्या जीवनासाठी आवश्यक अशा नैसर्गिक संसाधनांचा ऱ्हास करत आहोत . आधुनिकतेच्या नावे आपण शहरीकरण आणि औद्योगिकीकरणाला इतके महत्त्व दिले की त्याचा थेट फटका पर्यावरणाला बसू लागला आहे . शहरांतील गर्दी , उष्णता , ध्वनीप्रदूषण , आणि श्वसनास त्रासदायक वायू यामुळे माणसाचे आरोग्य धोक्यात आले आहे . लहान मुलांमध्ये वाढणारे दमा , ऍलर्जी , त्वचाविकार , तसेच वृद्धांमध्ये वाढणारे हृदयरोग आणि कर्करोग याला बऱ्याच अंशी प्रदूषण जबाबदार आहे .

या साऱ्या समस्यांचा मुकाबला करण्यासाठी सत्ताधाऱ्यांनी धोरणात्मक पातळीवर प्रयत्न करणं गरजेचं आहेच, पण त्याचबरोबर सामान्य नागरिक म्हणून आपल्याला आपल्या दैनंदिन जीवनशैलीत काही सकारात्मक बदल करणेही तितकेच आवश्यक आहे . आपली सवय म्हणजेच आपले पर्यावरण – हे तत्त्व लक्षात घेऊन आपल्याला नैसर्गिक संसाधनांचा वापर जपून करावा लागेल . यासाठी सुरुवात आपल्या घरापासूनच होऊ शकते . उदा . दिवसभर चालू असलेले पंखे , टीव्ही , वॉटर प्युरिफायर , किंवा वापरल्यानंतरही बंद न केलेले लाईट्स – हे सर्व वीजेचा अपव्यय करतात . वीज निर्माण करण्यासाठी मोठ्या प्रमाणात कोळसा वापरला जातो जो पर्यावरणासाठी घातक आहे . म्हणूनच वीजेचा वापर आवश्यकतेपुरता आणि जबाबदारीने करणे गरजेचे आहे . त्याचप्रमाणे , घरात नळ उघडा ठेवून दात घासणे किंवा भांडी घासताना सतत पाणी वाहू देणे , यामुळे दरवर्षी लाखो लिटर पाण्याचा अपव्यय होतो . ही छोटीशी सवय बदलल्यास मोठा फरक पडू शकतो .

वाहतुकीच्या साधनांमध्ये शक्य असल्यास सार्वजनिक वाहतुकीचा वापर करावा . दुचाकी किंवा चारचाकी ऐवजी सायकल किंवा चालत जाण्याची सवय लावल्यास आरोग्यही सुधारते आणि प्रदूषणही कमी होते . प्लास्टिकचा वापर टाळणे , पुनर्वापराचे साहित्य वापरणे , कंपोस्टिंगसाठी ओला कचरा वेगळा करणे , तसेच इको-फ्रेंडली उत्पादनांची निवड करणे हेही दैनंदिन जीवनात सहज शक्य आहे . आपल्या घरातील टेरेसवर , गॅलरीत किंवा छोट्याशा अंगणात झाडे लावणे , शहरांमध्ये शालेय किंवा सोसायटी स्तरावर वृक्षारोपण करणे ,

# बिंदुसरा धरणावर पर्यटकांची हुल्लडबाजी सुरुच ; जिल्हा प्रशासनाच्या सावधानता अन सुरक्षिततेच्या आवाहनाकडे दुर्लक्ष ; सुरक्षारक्षक नेमण्याची मागणी :- डॉ.गणेश ढवळे

बीड:- ( दि.०३ ) बीड शहराजवळील पाली येथील बिंदुसरा मध्यम प्रकल्प १०० टक्के पुर्णतः भरलेले असुन धरणाच्या सांडव्यावरून मोठ्या प्रमाणात पाणी वाहु लागले आहे या दृश्याचा अनुभव घेण्यासाठी नागरिक मोठ्या संख्येने धरण परिसरात गर्दी करत आहेत. मात्र सध्याची परिस्थिती अत्यंत धोकादायक असुन नागरीकांनी सुरक्षिततेच्या दृष्टीने जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण विभागाने दिलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे असे आवाहन करून सुद्धा पर्यटकांना याचे गांभीर्य नसुन त्याकडे दुर्लक्ष करत धरणाच्या भिंतीवर, सांडव्यावर, पायथ्याशी पर्यटक जमा होत असून पर्यटकांच्या हुल्लडबाजी व हलगर्जीपणामुळे अपघात घडुन जिवितहानी होऊ नये यासाठी प्रतिबंधकात्मक उपाययोजना म्हणून सुरक्षारक्षक तैनात करण्यात यावेत तसेच संभाव्य दुर्घटना घडल्यास संबधित विभागाच्या जबाबदार आधिका-यांवर प्रशासकीय करण्यात यावी अशी मागणी लेखी निवेदनाद्वारे सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी जिल्हाधिकारी , आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, कार्यकारी अभियंता जायकवाडी पाटबंधारे विभाग क्रमांक ३ बीड, उपविभागीय अधिकारी बीड,तहसीलदार बीड, पोलिस निरीक्षक



ग्रामीण पोलीस स्टेशन यांना केली आहे. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने नागरीकांना सावधानता व सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून केलेले आवाहन

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांनी केले आहे. जिल्हा प्रशासनाने सुचना करताना पाण्याचा प्रवाह अत्यंत वेगवान असुन अचानक पाण्याची पातळी वाढू शकते.त्यामुळे धरण परिसरात जाणे टाळावे, धरणाच्या काठावर उभे राहून फोटो किंवा सेल्फी घेणे अत्यंत धोकादायक असुन अपघाताची शक्यता असल्याने टाळावे तसेच पालकांनी मुलांना धरण परिसरात जाण्यापासून रोखावे आणि त्यांच्या हालचालींवर लक्ष ठेवावे आणि स्थानिक प्रशासन व आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे असे आवाहन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने केले आहे. मात्र याकडे पर्यटक दुर्लक्ष करताना दिसुन येत आहे. २०२१ मध्ये बिंदुसरा प्रकल्पाच्या सांडव्यातील पाण्याच्या डोहात बुडून २ युवकांचा दुर्दैवी मृत्यू दररोजच्या पावसाने पाणी पातळीत वाढ होत असून धोक्यात जीव घालुन पर्यटक लोखंडी पुलावरून धरणांच्या धरणाच्या भिंतीवर व पायथ्याशी पर्यटक सांडव्याच्या ठीकाणी जमा होत असुन सांडव्याच्या भिंतीवर चढतात फोटो काढतात त्यानिमित्ताने पाय घसरून अपघात घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. पाठीमागे दि.१९ ऑक्टोबर २०२१ रोजी याच बिंदुसरा प्रकल्पाच्या सांडव्यातील पाण्याच्या डोहात बुडुन ओंकार लक्ष्मण काळे वय १६ वर्षे आणि शिव संतोष पिंगळे वय १६ वर्षे रा.शिंदेनगर,कॅनाल रोड बीड यांचा मृत्यु झाला होता.

सावधान प्रतिबंधक क्षेत्र असा बोर्ड लाऊन पाटबंधारे विभागाने जबाबदारी झटकली ; प्रकल्पावरील सुरक्षारक्षक नेमकं काय करतात??


बिंदुसरा धरणाच्या सांडव्याशेजारी धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील कडेला “सावधान प्रतिबंधक क्षेत्र “असा फलक लावण्यात आला असून अपघात,दुर्घटना अथवा जिवितहानी झाल्यास जलसंपदा विभाग जबाबदार नाही,कार्यकारी अभियंता जायकवाडी पाटबंधारे विभाग क्रमांक ३ बीड आदेशावरून असा फलक लावण्यात आला असून या तलावाच्या ठिकाणी कुठल्याही प्रकारची संरक्षण व्यवस्था नसल्यामुळेच त्याठीकाणी अपघाताच्या घटना घडत असुन पाटबंधारे विभागाचे अधिकारी जबाबदारी झटकतात मात्र प्रकल्पाच्या सुरक्षिततेसाठी नेमलेले सुरक्षारक्षक नेमकं काय काम करतात असा प्रश्न उपस्थित होत आहे.त्यामुळे सुरक्षा रक्षक नेमण्यात यावेत.भविष्यात दुर्घटना घडल्यास संबधित जबाबदार आधिका-यांवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी अशी मागणी डॉ.गणेश ढवळे यांनी केली आहे.

# शिवाजीनगरमध्ये जुगार अड्ड्यावर धाड - ११ जुगाऱ्यांवर कारवाई, ९.७९ लाखांचा मुद्देमाल जप्त

बीड प्रतिनिधी बीड पोलीस अधीक्षक पदाची सूत्रे नवनीत कॉवत यांनी घेतल्यापासून बीड जिल्ह्यातील अवैध धंदे करणाऱ्या विरोधात तसेच गुंडगिरी,दादागिरी करणाऱ्यावर कडक कारवाई करत हद्दपारीसह मकोका अंतर्गतकारवाईकरण्यातआल्याआहेत. डी.वाय.एस.पी.पूजा पवार यांना मिळालेल्या गुप्त माहिती आधारे बीड शहरातील शिवाजीनगर पोलीस ठाणे हद्दीतील धांडे नगर येथे जुगार अड्डा राजरोस सुरू असल्याची माहिती मिळाली असता त्या जुगार अड्ड्यावर डीवायएसपी पूजा पवार यांनी आपल्या पथकासह छापा मारला मारून त्या ठिकाणी 11 जुगारी तिरट नावाचा जुगार खेळताना मिळून आले, तसेच त्यांच्याकडे रोख रक्कम 45,000/ रुपये, व मोटरसायकल, मोबाईल असे मिळून 9,79,000/ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. शिवाजीनगर पोलीस ठाणे हद्दीत येऊन बाहेरील पोलिस अधिकारी कारवाई करत असतील तर स्थानिक पोलिस अधिकारी कारवाई का करत नाहीत यांची देखील चौकशी बीड पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी केली पाहिजे. शिवाजी नगर पोलिस ठाणे हद्दीत अवैधधंदे बोकाळले असून अधिकारी व पोलिस कर्मचाऱ्यांच्या अर्थपूर्ण केल्यानेच जुगार अड्डा रोजरोज सुरू असल्याचे बोलले जात आहे.गेल्या महिन्यात शिवाजी नगर पोलिसांनी बार्शी रोडवरील सोमेश्वर मंदिराच्या पाठीमागील वीट भट्टी जवळ याच जुगार अड्ड्यावर कारवाई करत जुगार ठिकाणी लाखोची रोख रक्कम मिळाली असताना देखील फक्त 35,400/रुपये दाखण्यात आली होती.तसेच जुगार खेळणारे दहा ते पंधरा जण असताना फक्त पाच जणांवर कारवाई करूत मोबाईल हस्तगत करण्यात आले नव्हते व जुगार खेळणारा च्या दुचाकी सोडून देण्यात आल्या होत्या यामुळे त्या कारवाईकडे संशयाने पहिले जात होते. DYSP पूजा पवार यांनी दोन दिवसापूर्वी बार्शी नाका भागात कत्तलीसाठी जनावरे घेऊन जाणारे वाहन पाठलाग करून पकडण्यात आले होते.


ही कारवाई बीड पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत,अपर पोलिस अधीक्षक सचिन पांडकर,डी. वाय.एस.पी.पूजा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पो.मुरली गंगावणे, पो.प्रदीप पिंपळे, पो.अनिल मदने, यांच्यासह दंगल नियंत्रण पथकातील जवान सहभागी होते.

DYSP पूजा पवार यांनी दोन दिवसापूर्वी बार्शी नाका भागात कत्तलीसाठी जनावरे घेऊन जाणारे वाहन पाठलाग करून पकडण्यात आले होते.



### स्थानिक पोलीस अधिकारी संशयाच्या भोवऱ्यात

विशेष म्हणजे शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत जुगार अड्डा सुरू असूनही, स्थानिक पोलिसांनी या अड्ड्यावर कारवाई का केली नाही, याबाबत पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी चौकशी करण्याची गरज निर्माण झाली आहे. स्थानिक स्तरावर आर्थिक साटेलोटे असल्याचा संशय नागरिकांकडून व्यक्त केला जात आहे.



कडा : येथे शिवाजी आश्रुबा पोटे यांचे चिरंजीव स्वप्निल व राजु रामचंद्र दळवी यांची कन्या चि.सौ.का.तृप्ती यांच्या विवाह सोहळ्याप्रसंगी नवदांम्पत्यांना शुभेच्छा देतांना शेतकरी संघटनेचे बीड जिल्हाध्यक्ष अजिमोद्दिन शेख, प्रा.डॉ.राम बोडखे,रिजवान बेग,पत्रकार रहेमान सय्यद दिसत आहेत.माजी सभापती बळीराम गवते यांनी राष्ट्रवादीचे युवा नेते पार्थ दादा पवार यांची पुणे येथे भेट घेतली. यावेळी बीड जिल्ह्यात पक्षसंघटन वाढविण्याच्या दृष्टीने आणि इतर विविध विषयांवर चर्चा केली. यावेळी सोबत फैयाज पठाण, नंदू खोटे

# आ. प्रकाश दादा सोळंके रोड बनवा राजकारण करू नका



रस्ता रोको आंदोलनात हजारो चे संख्या ने उपस्थित रहा समाजवादी पक्ष तालुका अध्यक्ष नवीदोद्दीन सिद्दिकी यांचे आवाहन

माजलगाव / प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील माजलगाव तेलगाव रस्ता हा मृत्यू सापळा बनला आहे अनेक वर्षांपासून हा रस्ता खराब झाला असल्याने या रोडवर आणि खड्डे आणि रस्त्याला बळी पडलेल्या आहेत त्यामुळे दोन-तीन वर्षांमध्ये या रस्त्यावर अपघाताचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले असून या अपघातामध्ये शेकडो प्रवाशांचे बळी गेले तर अनेक जणांची घरे उध्वस्त झाली कारण हा रस्ता मृत्यूचा चा सापळा बनला आहे असे म्हणायला वांगी ठरणार नाही. अनेक वेळी वेगळे वेगळ्या पक्ष संघटनांनी अनेक तक्रार अर्ज, निवेदने देऊन लोकशाही मार्गाने मोर्चे, आंदोलने व विविध कार्यालय समोर उपोषण केली परंतु हा रस्ता बनवण्यासाठी महाराष्ट्र व जिल्हा शासन प्रशासनाला जाग आली नाही व माजलगाव चे सत्ताधारी आ. प्रकाश सोळंके हे ३०-३५ वर्षापासून माजलगावचे आमदार असून यांचे या रस्त्याच्या बाबतीत दुर्लक्ष होत असल्याने अनेक जणांना आपले प्राण गमवावे लागत आहेत. अनेक वेळा सर्व सामान्य जनतेने आ. प्रकाश सोळंके यांना सांगूनही हा रस्ता करण्यासाठी त्यांनी हा रस्ता बनवण्याचा प्रश्न वारंवार टाळला आहे म्हणून माजलगाव मतदार संघातील नागरिकांमध्ये व कार्यकर्त्यांमध्ये सत्ताधारी आ. प्रकाश सोळंके यांच्या व शासन प्रशासनाच्या व सिस्टमच्या विरोधात आक्रोशाचा वातावरण निर्माण झाले असून त्या अनुषंगाने दि. ५/६/२०२५ रोजी परभणी फाटा चौक येथे सर्व पक्षीय रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे, तरी नागरिकांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन माजलगाव समाजवादी पार्टी तालुका अध्यक्ष नवीदोद्दीन सिद्दिकी यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

# वार्षिक स्नेह संमेलन
## “अभ्युदय-2025” कार्यक्रमाचे उद्घाटन




प्रतिनिधी मत्स्योदरी शिक्षण संस्था संचलित, मत्स्योदरी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय,जालना आयोजित वार्षिक स्नेह संमेलन “अभ्युदय-2025” कार्यक्रमाचे उद्घाटन केले. याप्रसंगी विद्यार्थी,पालक व प्राध्यापकवृंदाशी संवाद साधला.तसेच प्रख्यात व्याख्याते प्रा.गणेशजी शिंदे यांचे व्याख्यान संपन्न झाले. यावेळी संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ.बी.आर. गायकवाड,श्री.राहुल भाले कर,प्राचार्य,प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी,विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

# ॲड.कपिल पाटील कायदेशीर क्षेत्रातील निष्णात व्यक्तिमत्त्व आणि समाजसेवक

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट नांदेड : नांदेड जिल्ह्याच्या सामाजिक आणि कायदेशीर वर्तुळात एक महत्त्वाचे नाव म्हणून ॲड. कपिल साहेबराव पाटील (कपिल पाटील) यांची ओळख आहे. ते केवळ एक वकील नसून, समाज प्रबोधन आणि राजकीय विश्लेषणातही सक्रिय असलेले एक बहुआयामी व्यक्तिमत्त्व आहेत. त्यांचा स्पष्टवक्तेपणा, सामाजिक संवेदनशीलता आणि तर्कसंगत विचार सरणी ही त्यांची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. शांत आणि संतुलित स्वभाव : ॲड. पाटील यांचा स्वभाव शांत, विवेकशील आणि संतुलित आहे. त्यांची नम्रता आणि सहज संवाद साधण्याची कला यामुळे ते समाजातील प्रत्येक स्तराशी सहज जोडले जातात. न्यायालयीन काम काजात ते धाडसी, निःपक्षपाती आणि आपल्या भूमिकेवर ठाम दिसतात. “विनम्र पण प्रामाणिक” हा त्यांचा दृष्टिकोन सहकारी आणि पक्षकारां सोबतच्या त्यांच्या वागणुकीत स्पष्टपणे दिसतो. तर्कशुद्ध विचारप्रणाली : ॲड. पाटील यांच्या विचारप्रक्रियेत तर्कशुद्धता आणि व्यावहारिकतेचा समन्वय आढळतो. ते कोणत्याही समस्येच्या मूळ कारणापर्यंत पोहोचून, त्यावर दीर्घ कालीन उपाय शोधण्यावर भर देतात. नैतिकता आणि सामाजिक जबाबदारी हे त्यांच्या प्रत्येक निर्णयाचे आधारस्तंभ आहेत. “न्याय हा केवळ कायद्याच्या पुस्तकात नसून, समाजाच्या मनात हवा” हे त्यांचे मत आहे. कायदेशीर जागृती आणि सामाजिक लेखणी : ॲड. पाटील यांचे लेखन प्रामुख्याने कायदेशीर जागृती, सामाजिक न्याय, शैक्षणिक सुधारणा आणि राजकीय विश्लेषण या विषयांवर केंद्रित आहे. ते नांदेड जिल्ह्यातील स्थानिक



समस्यांबरोबरच राष्ट्रीय महत्त्वाच्या विषयांवरही मराठी भाषेत सखोल लेखन करतात. त्यांच्या लेखांची भाषा अतिशय सोपी असल्याने, ती सामान्य माणसाच्या मनाला भिडते. समाजकार्य आणि युवा मार्गदर्शन : कायद्याच्या अभ्यासाव्यतिरिक्त, ॲड. पाटील यांना वाचन, सामाजिक संस्थांसोबत काम करणे आणि युवा पिढीला मार्गदर्शन करणे आवडते. साहित्य आणि इतिहासाच्या पुस्तकांद्वारे त्यांना नवीन दृष्टिकोन मिळतो. स्थानिक सांस्कृतिक कार्यक्रमांमधील त्यांचा सहभाग त्यांची समाजशीलता दर्शवतो. समाजाशी मूलभूत संपर्क : ॲड. पाटील यांचा समाजबांधवांशी असलेला संपर्क अगदी मूलभूत स्तरावर आहे. ग्रामीण भागांत कायदेशीर मदत शिबिरे, शैक्षणिक मार्गदर्शन कार्यशाळा आणि महिला सक्षमीकरणासाठीच्या प्रयत्नांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग असतो. सोशल मीडियावरही ते युवकांना प्रेरणा देतात. “समाजातील बदल हे व्यक्तिगत जागृतीतूनच शक्य आहे” हे त्यांचे ध्येयवाक्य आहे. राजकीय आणि कायदेविषयक प्रभुत्व : कायद्याच्या क्षेत्रात त्यांना भारतीय संविधान, फौजदारी कायदा आणि मालमत्ता विवादांमध्ये विशेष प्राविण्य आहे. राजकीयदृष्ट्या ते धोरणात्मक सुधारणा आणि पारदर्शकतेवर भर देतात. नांदेडच्या स्थानिक राज कारणातील घडामोडींवर त्यांचे बारीक लक्ष असते. गरीबांना मोफत कायदेशीर सल्ला देणे हा त्यांच्या वकिली सरावाचा एक महत्त्वाचा भाग आहे. ॲड.कपिल पाटील हे केवळ एक वकील नसून, समाजाचा विचार करणारे ते एक सामाजिक कार्यकर्ते आहेत. त्यांच्या बहुआयामी व्यक्तिमत्त्वात न्याय, शिक्षण आणि समाजसेवा यांचा अनोखा समन्वय साधला आहे. नांदेडसह संपूर्ण महाराष्ट्रात त्यांनी निर्माण केलेला प्रभाव त्यांच्या अथक परिश्रमाचे प्रतीक आहे. “ज्ञान आणि करुणा यांचे एकत्रीकरण हाच खरा सामाजिक बदलाचा मार्ग” अशी त्यांची दृढ श्रद्धा आहे.

# सारथीमार्फत मराठा-कुणबी विद्यार्थ्यांना परदेशात उच्च शिक्षणाची संधी

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट नांदेड : मराठा, कुणबी, कुणबी-मराठा, मराठा-कुणबी या जातीतील गुणवंत विद्यार्थ्यांना परदेशातील नामांकित विद्यापीठामध्ये उच्च शिक्षण घेण्यासाठी आर्थिक मदत पुरवणारी महाराजा सयाजीराव गायकवाड सारथी गुणवंत मुला-मुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत आहे. इच्छूक विद्यार्थ्यांनी सारथीच्या fs.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर विहित नमुन्यात ऑनलाईन अर्ज १६ जून २०२५ पर्यत सादर करावा असे आवाहन छत्रपती संभाजीनगरचे सारथीचे उपव्यवस्थापकीय संचालक यांनी केले आहे. शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून प्रभावीपणे राबविली जात आहे. या योजनेच्या माध्यमातून दरवर्षी ७५ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान केली जाते. ही योजना मराठा-कुणबी समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावर शिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहन देणारी ठरणार आहे. योजनेचा उद्देश आणि व्याप्ती :- ही योजना मराठा, कुणबी, कुणबी-मराठा, मराठा-कुणबी या जातीतील विद्यार्थ्यांना परदेशात पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका आणि पीएचडी QS World University Ranking मध्ये २०० च्या आत असलेल्या परदेशातील शैक्षणिक संस्थामध्ये प्रवेश घेणाऱ्या ७५ विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती मंजूर केली जाते. यामध्ये ५० जागा पदव्युत्तर पदवी/पदवीका आणि २५ जागा पीएचडी च्या विविध अभ्यासक्रमासाठी राखीव आहेत. शिष्यवृत्तीचे स्वरुप :- या योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क, निर्वाह भत्ता आणि वैयक्तीक आरोग्य विमा यासाठी आर्थिक सहाय्य मिळते. प्रतिवर्ष पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी कमाल ३० लाख रुपये आणि पीएचडी अभ्यासक्रमासाठी कमाल ४० लाख रुपये या मर्यादेत शिष्यवृत्तीचा लाभ दिला जातो. पात्रता निकष :- नागरिकत्व आणि रहिवास लाभार्थी हा मराठा, कुणबी, कुणबी-मराठा, मराठा-कुणबी जातीतील महाराष्ट्राचा रहिवासी आणि भारतीय नागरिक असावा.

# पोलीस दलात कर्तव्य बजावत असताना पो. उप नि. जायभाये यांनी समाजाशी ही नाळ घट्ट केली- ॲड. अजय राख



बीड(प्रतिनिधी)-पिंपळनेर सारख्या ग्रामीण भागातून सर्वसामान्य कुटुंबात जन्मलेल्या बाबासाहेब जायभाये यांनी शिपाई पदापासून पोलीस उपनिरीक्षक पदापर्यंत मजल मारली पोलीस दलात कर्तव्य बजावत असताना त्यांनी समाजाशी असलेली आपली नाळ ही घट्ट केली असे प्रतिपादन जिल्हा सरकारी वकील ॲड. अजय राख यांनी पोलीस उपनिरीक्षक बाबासाहेब जायभाये यांच्या सेवानिवृत्ती कार्यक्रमात बीड शहरातील नगर नाका येथील हॉटेल ऑलिव्ह येथे निरोप समारंभात बोलताना केले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस उपाधीक्षक विश्वंभर, जिल्हा वाहतूक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक विजयकुमार, सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक अरुणे, जि प सदस्य रामदास बडे, सामाजिक कार्यकर्ते आदिनाथ गवळी ,सामाजिक कार्यकर्ते डॉ. संजय तांदळे, प्रा. कल्याण पाखरे, दिलीप जायभाये, राजेंद्र गर्जे, अभियंता प्रशांत जायभाये, डॉ. पूनम जायभाये (मोराळे) ,डॉ. प्रियंका जायभाये, सेवानिवृत्त पोलीस हवालदार शिंदे, राम वनवे सर ,आदींनी आपले मनोगत व्यक्त केले .यावेळी बोलताना ॲड.अजय तांदळे यांनी पोलीस उपनिरीक्षक बाबासाहेब जायभाये यांनी पोलीस दलात यशस्वी कर्तव्य बजावल्याबद्दल अभिनंदन करून त्यांना पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी पोलीस उपाधीक्षक विश्वंभर यांनी आपले कर्तव्य प्रामाणिकपणे बजावले तर समाजात आणि खात्यामध्ये आपले नाव कायम राहते असे प्रतिपादन केले. यावेळी विजयकुमार जाधवर यांनी बाबासाहेब जायभाये यांच्यासोबत केलेल्या कामाचा लेखाजोखा मांडला. त्यांनी 1989 पासून ते आजपर्यंत सोबत सेवा बजावल्याचे सांगितले. यावेळी मान्यवरांनी त्यांनी आजपर्यंत केलेल्या कामाचा लेखाजोखा मांडला. बाबासाहेब जायभाये यांनी पोलीस दलात शिपाई पदापासून आपली सेवा सुरू केली त्यांनी बीड शहर, पेठ बीड, आष्टी ,अंबाजोगाई ,बीड ग्रामीण , वाहतूक शाखा, महामार्ग पथक मांजरसुंबा या ठिकाणी सेवा दिली. पोलीस उपनिरीक्षक पदावर पदोन्नती झाल्यापासून ते सेवानिवृत्ती पर्यंत त्यांनी पोलीस अधीक्षक कार्यालयात दोष सिद्धी कक्षात आपली सेवा दिली. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रा. भारत जायभाये यांनी केले तर समालोचन महादेव चाटे सर यांनी केले. यावेळी एड. अजय तांदळे, सामाजिक कार्यकर्ते डॉ.संजय तांदळे, पिंपळनेरचे सरपंच, उपसरपंच,सर्व सदस्य, सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन, सर्व सदस्य, गावातील प्रतिष्ठित मंडळी, पोलीस विभागाचे अधिकारी व कर्मचारी, बीड शहरातील नागरिक व मित्रपरिवार ,जायभाये यांचे नातेवाईक या कार्यक्रमाला बहुसंख्येने उपस्थित होते. शेवटी जायभाये परिवाराच्या वतीने सर्वांचे आभार मानण्यात आले.

# नांदेड जिल्हा मराठी पत्रकार संघाची कार्यकारिणी जाहीर

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट नांदेड : नांदेड जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या कार्यकारणीची ४-जुन रोजी बुधवारी घोषणा करण्यात आली. या कार्यकारिणी मध्ये कार्याध्यक्ष म्हणून ज्येष्ठ पत्रकार अनिल कसबे तर सरचिटणीस पदाची जबाबदारी पत्रकार अनुराग पोवळे यांच्यावर सोपविण्यात आली आहे. या कार्यकारिणीमध्ये नऊ उपाध्यक्ष, ११ संघटक यांच्यासह ४० जणांचा समावेश आहे. मराठी पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष संतोष पांडागळे यांनी जिल्हा कार्यकारणीला मान्यता देण्याची शिफारस मराठी पत्रकार परिषदेकडे केली होती.त्यानुसार सरचिटणीस तथा नांदेड जिल्हा प्रभारी प्रा.सुरेश नाईकवाडे यांनी मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने जिल्हा कार्यकारणीची अधिकृतरित्या घोषणा केली. सदर कार्यकारिणीची मुदत जिल्हाध्यक्ष यांच्या कार्यकाळा पर्यंत राहणार आहे. तसेच नविन अध्यक्षाची निवड लोकशाही पद्धतीने होणार असल्याचे प्रा. नाईकवाडे यांनी जाहीर केले आहे. यामध्ये नांदेड जिल्हा पत्रकार संघाच्या कार्याध्यक्षपदी अनिल कसबे यांची तर सरचिटणीसपदी अनुराग पोवळे यांची निवड करण्यात आली आहे.या कार्यकारणीत नऊ उपाध्यक्ष, अकरा जिल्हा संघटकही निवडण्यात आले आहेत. नूतन कार्यकारिणीमध्ये कार्याध्यक्षपदी ज्येष्ठ पत्रकार अनिल कसबे यांची निवड करण्यात आली आहे सरचिटणीस पदाची जबाबदारी पत्रकार अनुराग पोवळे यांच्यावर सोपवण्यात आली आहे. पत्रकार संघाच्या जिल्हा समन्वय समितीची प्रमुख जबाबदारी प्रकाश कांबळे, विजय जोशी, चारुदत्त चौधरी, अँड.प्रदीप नागापूरकर, गोवर्धन बियाणी आणि विद्यमान जिल्हाध्यक्ष संतोष पांडागळे यांच्याकडे राहणार आहे. या कार्यकारिणीत उपाध्यक्षपदी सुनील श्रीमनवार (किनवट), जी.पी. मिसाळे (धर्माबाद), अँड. दिगंबर गायकवाड (कंधार), प्रभाकर लखपत्रेवार (नायगाव), बी. आर. पांचाळ (भोकर), राजेश शिंदे राजापूरकर (नांदेड), राजेंद्र कांबळे (बिलोली), ॲड. संदीप कामशेट्टे (मुखेड) आणि गजानन पाटील (हदगाव) यांची निवड करण्यात आली आहे. परिषद प्रतिनिधी म्हणून सुभाष लोणे (अर्धापूर), सर्फराज दोसानी (माहूर) हे काम पाहतील. कोषाध्यक्ष पदाची जबाबदारी बजरंग शुक्ला (नांदेड) यांच्याकडे देण्यात आली आहे. जिल्हा पत्रकार संघाचे मुख्य संघटक म्हणून अविनाश पाटील (नांदेड) तर सह जिल्हा मुख्य संघटकपदी मनोहर कदम (नांदेड) तसेच जिल्हा संघटक म्हणून प्रदीप वाकोडीकर (किनवट), पंडित पतंगे (हदगाव), परमेश्वर गोपतवाड (हिमायतनगर), अभय कुळकजाईकर (नांदेड), सुनील पारडे (नांदेड), दिलीप वाघमारे (नायगाव), सुनील पोळकर (मुखेड), शेख अहमद (लोहा), संजय कोलते (मुदखेड), ॲड. सत्यनारायण मानसपुरे (कंधार) आणि अमृत देशमुख हे कार्यरत राहतील. जिल्हा पत्रकार संघाचे सहसचिव म्हणून ईश्वर पिनलवार (मुदखेड), रुपेश पाटील (देगलूर), राजेश वाघमारे (भोकर) तसेच राज ठाकूर (माहूर) यांची निवड करण्यात आली आहे. जिल्हा पत्रकार संघाच्या प्रसिद्धी प्रमुखपदी प्रा. शरद वाघमारे (अर्धापूर) व सह प्रसिद्धी प्रमुख, म्हणून सुभाष काटकांबळे (नांदेड) यांना संधी देण्यात आली आहे. कार्यकारिणी सदस्यपदी जयकुमार अडकिने (माहूर), शेख हुसेनी (उमरी), रमेश ठाकूर (सिडको नांदेड), ज्ञानेश्वर सुनेगावकर (नांदेड) आणि सचिन डोंगळीकर (नांदेड) यांची निवड झाली आहे. नवनियुक्त कार्यकारिणीचे मुख्य विश्वस्त एस.एम. देशमुख, विश्वस्त किरण नाईक, विश्वस्त शरद पाबळे, अध्यक्ष मिलींद अष्टीवकर, कार्याध्यक्ष शिवराज काटकर, सरचिटणीस प्रा.सुरेश नाईकवाडे, कोषाध्यक्ष मन्सूरभाई शेख, उपाध्यक्ष प्रकाश कांबळे, डिजिटल मीडिया परिषदेचे राज्य अध्यक्ष अनिल वाघमारे, विभागीय सचिव सचिन शिवशेट्टे, अधिस्वीकृती समितीचे विभागीय अध्यक्ष विजय जोशी, माजी सरचिटणीस चारुदत्त चौधरी, माजी जिल्हाध्यक्ष अँड. प्रदीप नागापूरकर, गोवर्धन बियाणी व जिल्हाध्यक्ष संतोष पांडागळे यांनी अभिनंदन केले आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर





आंतरराष्ट्रीय

# अमेरिकेत या १२ देशातील नागरिकांना नो एन्ट्री, ७ देशातील नागरिकांबाबतही अंशत: निर्बंध घातले


अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी एक मोठा निर्णय घेतला आहे. त्यांनी आता १२ देशांच्या नागरिकांचा अमेरिकेत प्रवेशावर पूर्ण बंदी आणली आहे. तसेच इतर ७ देशांमधून येणाऱ्या लोकांवर अंशतः निर्बंध घातले आहेत. या नवीन निर्णयावर ट्रम्प यांनी स्वाक्षरी केली आहे. अमेरिकेच्या राष्ट्रीय सुरक्षेबद्दल चिंता व्यक्त करत ट्रम्प यांनी हे पाऊल उचलले आहे. यासंदर्भातील वृत्त सीबीएस न्यूजने प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या हवाल्याने दिले आहे. कोणत्या देशांवर बंदी अमेरिकेत आता अफगाणिस्तान, म्यानमार, चाड, काँगो, इक्वेटोरियल गिनी, एरिट्रिया, हैती, इराण, लिबिया, सोमालिया, सुदान आणि येमेन यासह १२ देशांच्या नागरिकांना प्रवेश करण्यास बंदी असणार आहे. या देशांचे नागरिक आता अमेरिकेत प्रवेश करू शकणार नाहीत. तसेच ७ देशांमधून येणाऱ्या लोकांवरही बंदी घातली आहे. यामध्ये बुरुंडी, क्युबा, लाओस, सिएरा लिओन, टोगो, तुर्कमेनिस्तान आणि व्हेनेझुएला यांचा समावेश आहे. या देशांमधून येणाऱ्या लोकांवर काही अटी आणि कडक तपासणीनंतर अमेरिकेत प्रवेश मिळणार आहे. ट्रम्प यांनी काय



म्हटले? डोनाल्ड ट्रम्प यांनी आपल्या निर्णयात म्हटले आहे की, अमेरिकेच्या राष्ट्रीय सुरक्षेसाठी हे पाऊल उचलले आहे. अमेरिकन नागरिकांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी मला हे पाऊल उचलावे लागले आहे. आम्ही पुन्हा प्रवास बंदी लागू करू, त्याला काही लोक 'ट्रम्प ट्रॅव्हल बॅन' म्हणतात. यामुळे कट्टरपंथी इस्लामिक दहशतवाद्यांना देशात प्रवेश करण्यापासून रोखता येणार आहे. सर्वोच्च न्यायालयानेसुद्धा हा निर्णय योग्य ठरवला होता. व्हाइट हाउसकडून दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, काही देशांवर पूर्ण तर काही देशांवर अंशतः निर्बंध आणले आहे. ज्या देशातील नागरिक सुरक्षा तपासणीत अयशस्वी ठरले, त्यांच्याबाबत हा निर्णय घेण्यात आला. अमेरिकेसाठी गंभीर धोका निर्माण करणाऱ्या देशातील नागरिकांसाठी हा निर्णय घेतला गेला. ट्रम्प यांनी यांनी त्यांच्या पहिल्या कार्यकाळातही काही देशातील नागरिकांना अमेरिकेत प्रवेश करण्यास बंदी घातली होती. त्यावेळी त्यांनी ७ मुस्लिम देश इराक, सीरिया, इराण, सुदान, लिबिया, सोमालिया, येमेन येथील नागरिकांना अमेरिकेत येण्यास बंदी घातली होती.अमेरिकेला काय मान्य नाही? अमेरिका रशियाला आपलं शत्रू मानतो.

## युद्ध आणखी चिघळणार? युक्रेनला मिळाली अशी मदत ज्याने उडाली रशियाची झोप, तब्बल १ लाख,बाहुबली देश मदतीला!

रशिया आणि युक्रेन यांच्यातील युद्ध चांगलेच भडकले आहे. युक्रेनने रशियावर आतापर्यंतचा सर्वात मोठा ड्रोन हल्ला केला आहे. या ड्रोन हल्ल्यात एकूण 41 विमानं ध्वस्त झाली आहेत. या हल्ल्यानंतर रशिया देश चांगलाच चवताळला असून तो युक्रेनला चोख प्रत्युत्तर देण्याची शक्यता आहे. असे असतानाच आता रशियाला घाम फोडणारी माहिती समोर आली आहे. युक्रेनच्या मदतीला आता ब्रिटन उतरला असून या देशातर्फे चक्क 1 लाख ड्रोन युक्रेनला देण्यात येणार आहेत. ब्रिटन देणार एक लाख ड्रोन गेल्या साधारण अडीच वर्षांपासून रशिया आणि युक्रेन यांच्यात युद्ध चालू आहे. या काळात दोन्ही देशांनी एकमेकांवर मोठे हल्ले केले आहेत. अलिकडेच 2 जून रोजी ड्रोन हल्ले केले आहेत. युक्रेनने रशियात घुसून हे हल्ले केले आहेत. असे असतानाच आता ब्रिटेन देशाने युक्रेनला 2026 सालापर्यंत तब्बल 1 लाख ड्रोन देण्याचे ठरवले आहे. रशियासोबत



युद्ध चालू असताना रशियाला आता एवढी मोठी मदत मिळणार असल्याने आता युक्रेनचे बळ चांगलेच वाढणार आहे. ब्रिटनने युक्रेनला पुरण्यात येत असलेल्या ड्रोन्समध्ये तब्बल 10 पटीने वाढ केली आहे. मी जेव्हा चीनला जातो तेव्हा माझा फोन वॉशिंग्टनमध्ये सोडतो, पण जेव्हा भारतात येतो तेव्हा माझा फोन सोबत घेऊन येतो आणि व्हिडिओ कॉलद्वारे कुटुंबालाही दाखवतो. ड्रोन हल्ल्यांत युक्रेन सरस याआधी जर्मनीनेदेखील युक्रेनची मदत करण्याचे जाहीर केले होते. जर्मनी लवकरच युक्रेनला लांब पल्ल्यांचे क्षेपणास्त्र देणार आहे. युक्रेनला इतरही अनेक देशांकडून मदत मिळत आहे. तोफ, बंदूक तसेच गोळीबार यांच्या माध्यमातून केल्या जाणाऱ्या हल्ल्यांत रशिया युक्रेनपेक्षा वरचढ ठरतोय. मात्र ड्रोन हल्ल्यांमध्ये युक्रेनने सरशी घेतली आहे. त्यामुळे आता ब्रिटन युक्रेनला तब्बल 1 लाक ड्रोन देणार आहे. जर्मनीदेखील करणार युक्रेनला मदत ब्रिटनने युक्रेनला ड्रोन यांच्याव्यतिरिक्त 4.5 अब्ज पाउंड एवढी सैन्य मदत करण्याचे जाहीर केलेले आहे. याच घोषणेअंतर्गत आम्ही हे 1 लाख ड्रोन युक्रेनला देऊ असे ब्रिटनने स्पष्ट केलेय. ब्रिटनचे संरक्षणमंत्री जॉन हेली याबाबतची घोषणा करणार आहेत.

## भारत जागतिक व्यासपीठावर हवामान चॅम्पियन, असं गाठलं यशाचं शिखर



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात गेल्या 10 वर्षात हवामान बदलाचा सामना करण्यासाठी उल्लेखनीय प्रगती केली आहे. नवीकरणीय ऊर्जा, विशेषकरून सौर आणि पवन ऊर्जेत अभूतपूर्व वाढ झाली आहे. आंतरराष्ट्रीय सौर आघाडी (ISA) आणि राष्ट्रीय हरित हायड्रोजन मिशन सारख्या मोहिमेने भारताला वैश्विक हवामान बदल नेतृत्वात प्रमुख भूमिका प्रदान केली आहे.भारतात नेहमीच निसर्गाच्या बाबत प्रचंड आदर दिला गेला आहे. अथर्ववेदात म्हटल्यानुसार पृथ्वी आपली आई आहे आणि आपण तिची मुलं आहोत. हा विश्वास अनेक युगांपासून आपल्या जीवनशैलीचा भाग झाला आहे. गेल्या 11 वर्षात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात प्राचीन ज्ञानाला मजबूत आणि व्यावहारिक कार्यवाहीत बदलण्यात आलं आहे. भारत वैश्विक हवामानाच्या प्रयत्नात अनुयायापासून नेतृत्वाच्या भूमिकेत गेला आहे. स्पष्ट धोरणं, सार्वजनिक भागिदारी आणि स्वच्छ ऊर्जा तसेच स्थिरतेसाठी एका मजबूत प्रयत्नाच्या माध्यमातून सरकार सर्वांसाठी एक हरित, निरोगी आणि सुरक्षित भविष्य बनवण्यासाठी काम करत आहे.

## पाकिस्तानात गेलेल्या नागपूरच्या सुनीताच्या मोबाईलमध्ये सस्पेक्टेड ॲप,



नागपूर येथील सुनीता जामगाडे या महिलेलापाकिस्तानसाठी हेरगिरी केल्याच्या संशयावरुन अटक करण्यात आलेली आहे. सुनीता ही सीमा ओलांडून ती पाकिस्तानात गेली होती अशी माहिती समोर आलेली आहे. तसेच ती पाकिस्तातील काही लोकांच्या संपर्कात होती. त्यामुळे सुनीताची कसून चौकशी सुरु आहे. या चौकशीतून सुनीताच्या मोबाईलमध्ये काही सस्पेक्टेड ॆप आढळले आहेत. त्यामुळे आता सुनीतावरील संशय आणखी वाढला आहे. याबाबत पोलिसांनी महत्वाची माहिती दिली आहे.

सुनीता पाकिस्तानातील तीन नागरिकांच्या संपर्कात होती

सुनीता जामगाडेच्या चौकशीबाबत माहिती देताना झोन 5 चे पोलीस उपायुक्त निकेतन कदम यांनी सांगितले की, 'सुनिता जामगडे आमच्या ताब्यात आहे. दोन मे पर्यंत तिला पोलीस कस्टडी होती आता ती न्यायालयीन कस्टडीत आहे.

## युद्धाचं भीषण रुप समोर, युक्रेननं असा स्फोट घडवला की रशियाच्या काळजावर घाव कसा केला?

युक्रेन आणि रशिया यांच्यातील तणाव वाढतच चालला आहे. या दोन्ही देशांतील युद्ध आता भीषण रुप धारण करत आहेत. कारण गेल्या दोन दिवसांपासून युक्रेनने रशियावर शकडो ड्रोन हल्ले केले अशून अनेक क्षेपणास्त्रंही डागली आहेत. या हल्ल्यात आतापर्यंत रशियाचे हजारो सैनिक ठार झाले आहेत. असे असतानाच आता युक्रेनने रशियावर मोठा आघात केला आहे. युक्रेनने 1,100 किलो TNT स्फोटकांचा वापर करून रशियाचा महत्त्वाचा पूल उडवून दिलाय. क्रिमियन ब्रीजवर घडवून आणला स्फोट युक्रेनने पुलावर घडवून आणलेला हा



स्फोट म्हणजे रशियाला मोठा आघात असल्याचं बोललं जात आहे. युक्रेनच्या सुरक्षा सेवेने (एसबीयू) या अनोख्या मोहिमेबाबत माहिती दिली आहे. या मोहिमेअंतर्गत युक्रेनने क्रिमियन ब्रीजवर स्फोट घडवून आणला आहे. युक्रेनचा पुलावरील हा तिसरा हल्ला आहे. या तिसऱ्या आणि ताज्या हल्ल्यात मात्र या पुलाचे मोठे नुकसान झाले आहे. युक्रेनने यावेळी पाण्याखाली असलेल्या पुलाच्या पिलरवर स्फोट घडवून आणले आहेत.

या पुलाला आहे वेगळे महत्त्व

युक्रेनमधील माध्यमांनुसार तेथील स्थानिक वेळ सकाळी 4.44 वाजता हा हल्ला करण्यात आला. हा हल्ला यशस्वी व्हावा यासाठी गेल्या अनेक महिन्यांपासून योजना आखली जात होती, असे एसबीयूने सांगितले आहे. क्रिमियन ब्रीजच्या जलमग्न पोलवर हे स्फोट घडवून आणण्यात आले आहेत. या पुलाला खिलखिळं करण्यासाठीच हा हल्ला घडवून आणण्यात आलाय. क्रिमियन ब्रिज याला केर्च ब्रिजदेखील म्हटले जाते. या पुलामुळे रशिया आणि क्रिमिया हे एकमेकांशी जोडले गेलेले आहेत. त्यामुळेच या पुलाला फार महत्त्व आहे. क्रिमियाला ताब्यात घेतल्यानंतर रशियाने हा पूल बांधला होता. हा पूल म्हणजे रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांचा एक महत्त्वाचा प्रकल्प आहे. युक्रेनसोबतच्या युद्धात रशियाने याच पुलाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात शस्त्रांची ने आण केलेली आहे. याआधी दोन वेळा केले होते हल्ले युक्रेनने हा पूल खिळखिळा करण्यासाठी याआधी दोन वेळा हल्ले केलेले आहेत. पहिला हल्ला हा 8 ऑक्टोबर 2022 रोजी करण्यात आला होता. तेव्हा या पुलावर एक ट्रकचा स्फोट झाला होता. दुसरा हल्ला हा जुलै 2023 मध्ये झाला होता. या हल्ल्यात पुलाचा काही भाग उद्ध्वस्त झाला होता. दरम्यान, युक्रेनच्या या हल्ल्यानंतर अद्याप रशियाने कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही. मात्र युक्रेनच्या हल्ल्यानंतर या पुलावरील वाहतूक बंद करण्यात आली होती. स्थानिक वेळेनुसार सकाळी 9 वाजता या पुलावरील वाहतूक पुर्ववत झाली होती.

# भारताला रोखण्याचा प्रयत्न, एका मुस्लिम देशाने पाकिस्तानला दाखवली लायकी

ऑपरेशन सिंदूरनंतर सर्वपक्षीय भारतीय खासदारांची शिष्टमंडळ परदेश दौऱ्यांवर आहेत. विविध देशात जाऊन ही शिष्टमंडळं भारताची भूमिका मांडत आहेत. जगभरात पाकिस्तानची पोल-खोल सुरु आहे. त्यामुळे अस्वस्थ झालेल्या पाकिस्तानने भारतीय शिष्टमंडळाच्या मार्गात खोडा घालण्याचा प्रयत्न केला. भारतीय शिष्टमंडळाचे सर्व प्रस्तावित कार्यक्रम रद्द करावेत, अशी विनंती पाकिस्तानने मलेशियाकडे केली. पण मलेशियाने पाकिस्तानच्या विनंतीकडे दुर्लक्ष केलं. काश्मीरचा विषय संयुक्त राष्ट्रात असल्याच



पाकिस्तानने मलेशियाला सांगितलं. मलेशिया सुद्धा मुस्लिम देश असल्याने पाकिस्तानने धार्मिक कार्ड खेळण्याचा प्रयत्न केला. संजय झा यांच्या नेतृत्वाखालील भारतीय शिष्टमंडळाचे सर्वच्या सर्व 10 कार्यक्रम रद्द करावेत, अशी मागणी पाकिस्तानी दूतावासाने मलेशियाकडे केली. "आपण इस्लामिक देश आहोत. तुम्ही इस्लामिक देश आहात. भारतीय शिष्टमंडळाच ऐकू नका. मलेशियातील त्यांच सर्व कार्यक्रम रद्द करा" असं पाकिस्तानी दूतावासाने मलेशियन सरकारला सांगितलं होतं. पण मलेशियन सरकारने त्यांचं काही ऐकलं नाही. मलेशियाने पाकिस्तानची मागणी फेटाळून लावली. मलेशियन सरकारने नऊ सदस्यीय शिष्टमंडळाला सर्व 10 प्रस्तावित कार्यक्रम आयोजित करण्याची परवानगी दिली. विविध देशांच्या दौऱ्यावर असलेल्या शिष्टमंडळाला मलेशिया शेवटचा स्टॉप आहे. जपान, दक्षिण कोरिया, सिंगापूर आणि इंडोनेशिया या देशांचा दौरा या शिष्टमंडळाने केलाय. शनिवारी संजय झा यांच्या नेतृत्वाखालील भारतीय शिष्टमंडळ मलेशियामध्ये पोहोचलं. कोणा-कोणाची भेट घेतली?मलेशियाला गेलेल्या शिष्टमंडळाच नेतृत्व जेडीयू खासदार संजय झा करत आहेत. त्यात भाजप खासदार अपराजिता सारंगी, ब्रिज लाल, हेमांग जोशी, तृणमुल काँग्रेसचे अभिषेक बॅनर्जी, सीपीएमचे जॉन ब्रिट्टा, काँग्रेसचे सलमान खुर्शीद आणि बहरीन, फ्रान्सचे माजी राजदूत मोहन कुमार त्यामध्ये आहेत. भारतीय शिष्टमंडळाने मलेशियन पीपल्स जस्टीस पार्टीचे वायबी सीम, माजी पंतप्रधान माहाथीर मोहम्मद यांची भेट घेऊन भारताची भूमिका समजावून सांगितली.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com